# महाराष्ट्र शासन

क्र.-पीटीए-१३१८/२१/प्र.क्र.२२/का.१६,
विधि व न्याय विभाग,
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :-१२.०४.२०१८.

प्रति,
कार्यकारी अधिकारी,
श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर, जि.सोलापूर.

**विषय:-** पंढरपूर मंदिरे अधिनियम कलम २१ च्या पोट कलम १ अन्वये स्थापन केलेल्या समितीला सल्ला देण्यासाठी घटीत केलेल्या सल्लागार परिषदेची अधिसूचना.

**महोदय,**

पंढरपूर मंदिरे अधिनियम १९७३ (१९७४ महा.९) च्या कलम २१ च्या पोट कलम १ अन्वये स्थापन केलेल्या समितीला सल्ला देण्यासाठी घटीत करण्यात आलेल्या सल्लागार परिषदेच्या अधिसूचनेची प्रत आपल्या माहिती व पुढील कार्यवाहीसाठी यासोबत जोडली आहे.

आपली,

सोबत:- वरीलप्रमाणे

(रा.व. चव्हाण)
**कार्यासन अधिकारी, विधि व न्याय विभाग.**

दिनांक- 26 APR 2018
संकलन- आस्थापना
अ. का -
कार्यकारी अधिकारी-

आ.रजि.क्र....२९८....

RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ४, अंक ४२(६)] गुरुवार, एप्रिल ५, २०१८/चैत्र १५, शके १९४० [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १००**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश**

**विधि व न्याय विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ एप्रिल २०१८

**आदेश**

**पंढरपूर मंदिरे अधिनियम, १९७३.**

क्रमांक पीटीए-१३१८/२१/प्र.क्र. २२/का-१६.—पंढरपूर मंदिरे अधिनियम, १९७३ (१९७४ चा महा. ९ याच्या कलम ३२अ च्या पोट-कलम (१), (२) व (३) यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, **महाराष्ट्र शासन,** याद्वारे,—

(क) उक्त अधिनियमाच्या कलम २१ च्या पोट-कलम (१) अन्वये स्थापन केलेल्या समितीला सल्ला देण्यासाठी सल्लागार परिषद घटित करीत आहे ;

(ख) उक्त पोट-कलम (२) च्या खंड (तीन) द्वारे तरतुद केल्याप्रमाणे यासोबत जोडलेल्या अनुसूचीतील नोंद क्रमांक ३ ते ९ येथे नमूद केलेल्या इतर सदस्यांना उक्त परिषदेवर नामनिर्देशित करीत आहे ; आणि

(ग) उक्त परिषद ही उक्त अनुसूचीत विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अध्यक्ष, सदस्य व सचिव यांची मिळून बनलेली असेल, असे घोषित करीत आहे.

**अनुसूची**

| अ. क्र.<br>(१) | नाव<br>(२) | पद<br>(३) |
|---|---|---|
| १. | अध्यक्ष, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर | पदसिद्ध अध्यक्ष |
| २. | जिल्हाधिकारी, जिल्हा सोलापूर | पदसिद्ध सदस्य |
| ३. | ह.भ.प. प्रसाद महाराज अमळनेरकर | सदस्य |
| ४. | ह.भ.प. चैतन्य महाराज देगलुरकर | सदस्य |
| ५. | ह.भ.प. विठ्ठल महाराज वासकर | सदस्य |

| अ.क्र. (१) | नाव (२) | पद (३) |
|---|---|---|
| ६. | श्री. अनिल बाळकृष्ण अत्रे | सदस्य |
| ७. | श्री. सुनिल नामदेवराव रुकारी | सदस्य |
| ८. | श्री. चारुदत्त गोंविदशास्त्री आफळे | सदस्य |
| ९. | ह.भ.प. महादेव महाराज शिवणीकर | सदस्य |
| १०. | कार्यकारी अधिकारी, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर | सचिव |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**एन. जे. जमादार,**

शासनाचे प्रधान सचिव व विधि परामर्शी.

## LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 5th April 2018

### Order

PANDHARPUR TEMPLES ACT, 1973.

No. PTA-1318/21/C.R. 22/Desk-XVI.—In Exercise of the powers conferred by sub-section (1), (2) and (3) of section 32A of the Pandharpur Temples Act, 1973 (Mah. IX of 1974), the Government of Maharashtra hereby,—

(a) constitutes the Advisory Council to advise the Committee established under sub-section (1) of section 21 of the said Act ;

(b) nominates, as provided by clause (iii) of the said sub-section (2), the other Members mentioned in entries 3 to 9 in the Schedule appended hereto on the said Council ; and

(c) declares that the said Council shall consists of the Chairman, Members and the Secretary, as specified in the said Schedule.

Schedule

| Sr. No. (1) | Name (2) | Designation (3) |
|---|---|---|
| 1. | Chairman, Shree Vithal Rukmini Temples Committee, Pandharpur | Ex-officio Chairman. |
| 2. | The Collector, District Solapur | Ex-officio Member. |
| 3. | H.B.P. Prasad Maharaj Amalnerkar | Member |
| 4. | H.B.P. Chaitanya Maharaj Deglurkar | Member |
| 5. | H.B.P. Vithal Maharaj Vaskar | Member |
| 6. | Shri Anil Balkrishna Atre | Member |
| 7. | Shri Sunil Namdeorao Rukari | Member |
| 8. | Shri Charudatta Govindshastri Aafale | Member |
| 9. | H.B.P. Mahadeo Maharaj Shivanikar | Member |
| 10. | Executive Officer, Shree Vithal Rukimi Temples Committee, Pandharpur | Secretary |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

N. J. JAMADAR,

Principal Secretary to Government & R.L.A.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI

पंढरपूर मंदिर अधिनियम, १९७३
कलम ३२-अ (४) अनुसार सल्लागार
परिषदेची कार्ये व कर्तव्ये निश्चित
करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
शासन आदेश क्र.पीटीए१३१८/प्र.क्र.१०१/का.१६
दिनांक:-११जुलै, २०१८.

संदर्भ :-विधि व न्याय विभाग, आदेश क्र. पीटीए१३१८/२१/प्र.क्र.२२/का.१६, दि. ५.०४.२०१८

## शासन आदेश

विधि व न्याय विभाग, शासन निर्णय दिनांक ५.०४.२०१८ अन्वये पंढरपूर मंदिर अधिनियम, १९७३ (१९७४ चा महा.९ याच्या कलम ३२ अ च्या पोट कलम (१),(२) व (३) यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन सदर अधिनियमाच्या कलम २१ च्या पोट कलम (१) अन्वये स्थापन केलेल्या समितीला सल्ला देण्यासाठी सल्लागार परिषद घटीत करण्यात आली आहे.

२. सदर सल्लागार परिषदेसाठी पंढरपूर मंदिर अधिनियम, १९७३ (१९७४ चा महा.९ याच्या कलम ३२ अ च्या पोट कलम (१),(२) व (३) यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन पुढील प्रमाणे सल्लागार परिषदेची कार्ये व कर्तव्ये निश्चित करण्यात येत आहेत :-

१ पंढरपूर मंदिर अधिनियम, १९७३ यास अनुसरुन मंदिराची व्यवस्था अधिक प्रभावी व वृध्दिंगत करण्यासंबंधी सल्ला देणे.

२ विठ्ठल व रुक्मिणी मंदिरामध्ये व परिसरात शांतापूर्वक धार्मिक वातावरण निर्माण व्हावे म्हणून विकास करण्याच्या व योजना पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ सल्ला देणे.

३ मंदिरातील नित्य म्हणजे दैनंदिन नैमित्तिक व प्रासंगिक पुजा/ सेवा यथोचितरित्या पार पाडण्यासबंधी व सर्वसाधारणपणे / किंवा विशेष प्रसंगी त्यामधील समारंभ उत्सव व महोत्सव यथोचितरित्या पार पाडण्यासाठी सल्ला देणे.

४ मंदिराच्या व मंदिरास भेट देणाऱ्या भक्तजनांच्या व यात्रेकरुंच्या हिताच्या दृष्टीने करावयाच्या योजना संबंधी समितीस शिफारस करणे.

५ मंदिरामध्ये सुव्यवस्था व शिस्त आणि योग्य आरोग्यप्रत वातावरण राहील आणि स्वच्छता विषयक योग्य तो दर्जा ठेवण्यात येईल याबाबत विश्वस्त मंडळास शिफारस करणे, सल्ला देणे.

६ सर्व संतांच्या शिकवणूकीतील भावार्थ सिध्दांत व तत्वज्ञान या संबंधीचे ज्ञान देण्यासाठी तो आचरणात आणण्यासाठी त्याचा प्रसार व प्रचार करण्यासाठी योजना तयार करणे व विश्वस्त मंडळास शिफारस करणे.

७ पंढरपूर येथे येणाऱ्या भक्तांच्या विठ्ठल रुक्मिणी मंदीरासंबंधी रुढी-परंपरा जोपासल्या जाव्यात तसेच भक्तांच्या सोई-सुविधांकरीता पंढरपूर मंदिर अधिनियम, १९७३ मधील तरतूदी व महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० मधील तरतूदींशी सुसंगत सल्ला देणे.

८ समिती वेळोवेळी ज्या विषयांवर सल्ला मागेल त्या विषयांवर पंढरपूर मंदिर अधिनियम, १९७३ मधील तरतूदी व महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० मधील तरतूदीशी सुसंगत सल्ला देणे.

९ समिती सल्लागार परिषदेने दिलेला सल्ला व शिफारशीचा आदर करेल व आर्थिक, तांत्रिक व कायदेशीर बाबींच्या अधीन राहून त्या सल्ला व शिफारशींची अंमलबजावणी करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सुपसाळुंके

( सु. प. साळुंके )

कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रत -

१.प्रधान सचिव व विधि परामर्शी, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई

२. विधि सल्लागार-नि-सह सचिव (कार्यासन १६) , विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई

३. अध्यक्ष ,श्री विठठल रुक्मिणी मंदिर समिती, श्रीक्षेत्र पंढरपूर, जिल्हा सोलापूर.

४.कार्यकारी अधिकारी,श्रीविठठल रुक्मिणी मंदिर समिती,श्रीक्षेत्र पंढरपूर.जि. सोलापूर

५. निवड नस्ती /कार्यासन१६.